पुण्य नगरी

# In Short

## जवळा येथे सायबर सुरक्षा कार्यक्रमास प्रतिसाद



**येडशी :** धाराशिव तालुक्यातील जवळा (दुमाला) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत शनिवारी (दि. १७) कार्यक्रम घेण्यात आला.या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या उपक्रमामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील वैष्णवी पाटील व स्वप्नाली जाधव या विद्यार्थिनींनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. आजच्या ऑनलाईन युगामध्ये विविध प्रकारे फसवणूक कशी होते? याची त्यांनी माहिती दिली. अशा प्रकारे फसवणूक होऊ नये म्हणून काय दक्षता घ्यावी, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. अनोळखी व्यक्तींना ओटीपी सांगू नये, अनोळखी नंबरवरून आलेले कॉल्स पडताळणी करावेत, व्हाट्स ॲप व सोशल मीडियावर आलेले मेसेज व लिंकची शहानिशा करावी व त्यानंतरच पुढील प्रक्रिया करावी, पासवर्ड स्ट्रॉंग वापरून आपली माहिती सुरक्षित करावी, मोबाईल , कॅम्पुटर , लॅपटॉप इत्यादी साधनावर अधिकृत ॲन्टीव्हायरसचा वापर करावा असे आवाहन त्यांनी केले.